advt15

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

## कृषी तंत्र निकेतन पदविकाधारकांसाठी कृषी पदवी प्रवेश २०१५-१६

## (प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये)

(सविस्तर माहितीसाठी कृपया **www.mcaer.org** किंवा **maha-agriadmission.in** पहा)

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामधील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजी भाषा राहील.

**अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता व जागा**

| अभ्यासक्रम | प्रथम वर्षाकरिता प्रवेश पात्रता व जागा | थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेश पात्रता व जागा |
|---|---|---|
| बी.एस्सी.(कृषी) | कृषी तंत्र निकेतन पदविका (Agril. Polytechnic) उत्तीर्ण. | कृषी तंत्र निकेतन पदविका (Agril. Polytechnic) (खुल्या प्रवर्गासाठी किमान ६० टक्के व मागास प्रवर्गासाठी किमान ५० टक्के गुणधारक) उत्तीर्ण. |
| | प्रवेश क्षमतेच्या १० टक्के अतिरिक्त जागा | प्रवेश क्षमतेच्या २० टक्के अतिरिक्त जागा |

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील कृषी तंत्र निकेतन पदविकाधारकांसाठीची प्रवेश प्रक्रिया मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे (केटीपीएल) यांचेद्वारा 'ऑनलाईन पध्दती'ने पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'केटीपीएल' च्या अनुक्रमे **www.mcaer.org** व **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर दि. २७ जून,२०१५ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशोच्छुकांनी '**maha-agriadmission.in**' या संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे **दि. ०७ जुलै,२०१५ रोजी किंवा त्यापूर्वी** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा.
- 'ऑन लाईन' भरलेल्या प्रवेश अर्जाची प्रत download करून त्यावर उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र चिकटवावे. प्रवेश अर्जावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी आणि प्रवेश अर्जासोबत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या स्वयं स्वाक्षांकित (self attested) प्रती जोडून मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. यांच्या **पुणे / औरंगाबाद / नागपूर / अमरावती / दारव्हा (जि.यवतमाळ) / परभणी / जळगाव /कोल्हापूर / सोलापूर / अहमदनगर / दापोली (जि.रत्नागिरी)** यापैकी कोणत्याही एका **प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्राकडे (ARC)** पोचदेय टपालाने (RPAD) अथवा कुरीयर सेवेमार्फत **दि.१३ जुलै,२०१५ पर्यत** प्रवेश अर्ज पाठवावा.

**विशेष सूचनाः**

ज्या उमेदवारांनी यापूर्वीच्या नियमित प्रवेश प्रक्रियेंतर्गत परिपूर्ण प्रवेश अर्ज दाखल केलेले आहेत, त्यांनी पुनश्च प्रवेश अर्ज दाखल करू नयेत. अशा उमेदवारांना त्यांचे विकल्प सुधारीत करण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

advt15

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. ६००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. ३००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

**शुल्क प्रदानाची पध्दती-**

भारतीय स्टेट बँकेच्या शाखेमध्ये चलनाद्वारे / नेट बँकींगद्वारे शुल्क भरण्यात यावे किंवा धनाकर्षाद्वारे शुल्क भरण्यात यावे. धनाकर्ष 'वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे' यांच्या नावे पुणे येथे देय असावा. सदर धनाकर्ष प्रवेश अर्जासोबत जोडावे. चलनाद्वारे शुल्क भरल्यास चलनाची छायाप्रत प्रवेश अर्जासोबत जोडावी.

टपाल / कुरीयर सेवेच्या विलंबामुळे प्रवेश अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास कृषी परिषद, 'केटीपीएल' अथवा संबंधित कृषी विद्यापीठ जबाबदार राहणार नाहीत.

**अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात न घेता रद्दबातल ठरविण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

क्र. मकृप/शिक्षण-१/१३१५/ १३५० / २०१५

दिनांक- २० जून,२०१५

**महासंचालक**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

पुणे